# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मिरज (जि.सांगली) येथे गणपती मूर्तीची विंटबना झाल्याने अटक झालेल्या व्यक्तीवरील गुन्हे काढून टाकण्याच्या प्रस्ताव**

**(१) ११२७४ (०६-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथे गणपती मूर्तीची विंटबना झाल्याने सन २००९ मध्ये उसळलेल्या दंगलीत शिरोळ, मिरज, सांगली इंचलकरंजी, हातकणंगले, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी अटक झालेल्या व्यक्तीवरील गुन्हे काढून टाकण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) व (२) मिरज, (जि.सांगली) येथे गणेश उत्सवादरम्यान व त्यानंतर शिरोळ, मिरज, सांगली, इंचलकरंजी, हातकणंगले, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी झालेल्या जातीय दंगलीमध्ये विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदरील गुन्हे काढून घेण्याबाबत शासनाकडे अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जावर शासनामार्फत अदयाप कोणतीही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तंबाखुवर लावलेला मुल्यवर्धित (व्हॅट) कर तातडीने रद्द करण्याबाबत**

**(२) ११२७९ (०६-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अनुत्पादित तंबाखुवर १२.५ टक्के मुलयवर्धित (व्हॅट) कर लागू केला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुत्पादित तंबाखुचा व्यवसाय कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथे सुरु असल्याने त्याचा परिणाम या क्षेत्रातील कामगार व व्यवसायावर झाला असल्याने या व्यवसायावर लावलेला मुल्यवर्धित (व्हॅट) कर तातडीने रद्द करण्याबाबत सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींसह विविध संघटनाच्या पदाधिका-यांनी मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी अनुत्पादित तंबाखुवरील मुल्यवर्धित कर रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,
(४) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेऊन कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) अनुत्पादित तंबाखुचा बहुतांश व्यापार आंतरराज्य विक्रीचा असल्याने १६ ऑगस्ट, २०१४ पासून तंबाखुवरील केंद्रीय विक्रीकर माफ करण्यात आला आहे.
(४) लागू नाही.

---

**आरेगांव (ता. मेहकर, जि. बुलढाणा) येथे महिलांसाठी शौचालये, विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले इत्यादि विविध समस्यांबाबत**

**(३) ११२८१ (०७-०४-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर तालुक्यातील (जि.बुलढाणा) आरेगांव येथे महिलांसाठी शौचालये, विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले इत्यादि विविध समस्यांसाठी गावकऱ्यांनी दि. ११ ऑगस्ट, २०१४ रोजी गटविकास अधिकाऱ्यांना घेराव घालून निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनात कोणकोणत्या तक्रारी नमुद केल्या आहेत,
(३) असल्यास, वरिल तक्रारी निवारण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०५-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) निवेदनात पुढीलप्रमाणे तीन तक्रारी नमूद केल्या असून त्यावर शासनाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे

| निवेदानातील तक्रारी | शासनाने केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) निर्मल भारत अभियानंतर्गत सन २०12 मध्ये झालेला बेसलाईन सर्वेक्षण परत करणे. | अ) निर्मल भारत अभियान (आताचे स्वच्छ भारत मिशन) अंतर्गत पायाभूत सर्वेक्षणाची माहिती अद्ययावत करण्यासाठी केंद्र शासनातर्फे दरवर्षी एप्रिल महिन्यामध्ये डेटा एंट्रीची लिंक सुरु होणार आहे. |
| ब)शौचालय बांधकाम प्रोत्साहनपर रक्कम पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव पंचायत समितीस्तरावर सादर करणे. | ब) शौचालय बांधकाम प्रोत्साहनपर रक्कम पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव पंचायत समितीस्तरावर सादर करुन लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर रक्कम वितरीत करण्यात आली. |
| क) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले व इतर दाखले वेळेवर मिळणे. | क) ग्रामपंचायत स्तरावरुन लागणारे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षिणक तथा इतर अनुषंगिक दाखले वितरणात विलंब होत असल्याबाबतच्या तक्रारीवरुन आरेगांव ग्रामपंचायत कार्यरत ग्रामसेवक श्री.आर.एस.काळे यांची तत्काळ ग्रामपंचायत गोहगांव, ता.मेहकर येथे स्थानांतर करण्यात आले. |

---

**राज्याची आर्थिक स्थितीबाबत श्वेतपत्रिका काढण्याचा प्रस्तावबाबत**

**(४) ११३०३ (०७-०४-२०१५). श्री. संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची सध्याची आर्थिक स्थिती, स्वीकृत दायित्व, भविष्यातील वाटचाल आणि खर्च अधिक पारदर्शक व कार्यक्षमरितीने करण्यासाठी आवश्यक उपाययोजना विशद करणारी श्वेतपत्रिका काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील शासनाने निर्णय घेतला आहे काय, तसेच या संदर्भातील श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे काय, तिचे स्वरुप काय आहे,
(३) अद्यापही याप्रकरणी निर्णय होऊन श्वेतपत्रिका काढण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१५) :**(१) महाराष्ट्र राज्याच्या वित्तीय स्थितीची श्वेतपत्रिका सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात (पहिले) दि. १० एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहता सादर करण्यात आली आहे.
(२) या संदर्भात काढण्यात आलेल्या श्वेतपित्रकेत राज्याची आर्थिक स्थिती, स्वीकृत दायित्वे, भविष्यातील वाटचाल आणि खर्च अधिक पारदर्शक व कार्यक्षमरितीने करण्यासाठी आवश्यक उपाययोजना विशद करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व सिंचन महामंडळामध्ये गेली १८ वर्षे मनमानी नियम करून गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे सर्रासपणे चालू असल्याबाबत**

**(५) ११३२५ (०७-०४-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व सिंचन महामंडळामध्ये गेली १८ वर्षे मनमानी नियम करून गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे सर्रासपणे चालू असल्यामुळे याला आळा घालण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास जलसंपदा विभागासाठी सर्वकष स्वतंत्र नियमावली तयार करण्यासाठी खात्यातील विद्‌यामान आणि माजी अधिका-याची एक समिती तयार करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, सदर अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) सध्या सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा या विभागासाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली लागू आहे. डॉ.माधवराव चितळे, जलतज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त सिंचन विषयक विशेष चौकशी समितीने जलसंपदा विभागासाठी स्वतंत्र नियम संहिता असावी, अशी शिफारस केली आहे. सदर शिफारशीच्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील कामांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यासाठी दि. ०५.१२.२०१४ रोजी खात्यातील विद्‌यमान व माजी अधिकाऱ्यांची समिती गठीत केली आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) दि.०५.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीला नियमावली तयार करण्याकरीता ६ महिन्याचा कालावधी विहित करण्यात आला आहे.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक,**
**गट निदेशक यांना रिक्त पदावर कायम करण्याबाबत**

**(६) ११३३० (०८-०४-२०१५). डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक, गट निदेशक यांना कायमस्वरुपी रिक्त पदावर कायम करण्याचा निर्णय अद्याप प्रलंबित असून सदरहू संस्थांमध्ये कंत्राटी निदेशक म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी याबाबत अनेकदा आंदोलने केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेमधील संबंधित कर्मचाऱ्यांना रिक्त पदावर कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) होय.

(२) सदर कंत्राटी तत्वावर मंजूर असलेली पदे नियमित वेतनश्रेणीत मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधेरीतील वेसावे बंदरावर मोठ्या प्रमाणात मासेमारी व्यवसायमूळे**
**लोकांना रोजगार उपलब्ध होत असल्याबाबत**

**(७) ११३३१ (०४-०४-२०१५). डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरीतील वेसावे बंदरावर ४५० ते ५०० मासेमारी नौका असून मोठ्या प्रमाणात मासेमारी व्यवसाय चालत असून या व्यवसायामुळे लाखो लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्सोवा येथे मासेमारी जेट्टी बांधण्यात यावी व, मुंबई उपनगरातून वर्सोवा खाडीत येणार केमिकलचे पाणी तसेच इतर घाण पदार्थ यामुळे खाडीतील गाळ साठून मच्छिमारी बोटी गाळामध्ये रुतून, बुडून जाण्याचे असे अनेक प्रकार होतात, इ मागण्या मच्छिमारी संघटनानी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मच्छिमारांच्या प्रमुख मगाण्यावर शासन दुर्लक्ष करित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मच्छिमारांना त्यांचा रोजगार उपलब्ध करुन व त्यांना न्याय मिळवून देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) वर्सोवा येथे मत्स्यबंदर बांधण्याच्या कामास शासण निर्णय दि.१६.९.२०११ अन्वये रु.४९.२८ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्रस्तावित कामामध्ये गाळ काढण्याच्या कामाचा समावेश आहे.

---

**राज्यातील म्हाडा मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी**
**पेंशन योजना लागू करण्याबाबत**

**(८) ११३३२ (०६-०४-२०१५). डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील म्हाडा मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी पेंशन योजना लागू करण्यासंदर्भात गेली २७-२८ वर्षे शासनाकडे मागणी करुनही त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने वयाची सतरी ओलांडल्यानंतरही त्यांना न्याय हक्कासाठी लढावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडातील मुंबई इमारत दुरुस्ती मंडळ व गलिच्छ वस्ती सुधार मंडळ या दोन मंडळातील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू असतांना मात्र महाराष्ट्र गृहनिर्माण व विदर्भ गृहनिर्माण मंडळाच्या कर्मचाऱ्यांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार अंतिम निर्णयाबाबतचे प्रकरण शासनाने अमान्य केले असल्याने या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत शासन याचा पुर्नविचार करणार आहे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१), (२) व (३) म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रितंडळाने अमान्य केला आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनावर राज्य शासनास आर्थिक भार वाढत असल्यामुळे कोणत्याही आस्थापनेवरील मंडळे/ महामंडळे इत्यादी कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, विदर्भ गृहनिर्माण मंडळ, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना व महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधार मंडळ ही चार मंडळे एकत्रित करुन म्हाडाची स्थापना करण्यात आली. त्यापैकी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधार मंडळ या मंडळातील कर्मचारी शासकीय असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना त्यांच्या मूळ सेवाप्रवेश नियमानुसार लागू करण्यात आली. महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ व विदर्भ गृहनिर्माण मंडळ या मडळातील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाची योजना लागू करण्यात आलेली नसून, त्यांना अंशदायी निर्वाह निधी योजना लागू करण्यात आली.

म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा. उच्च न्यायालयात विविध व्यक्ती आणि संघटना यांच्या वतीने जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सर्व याचिकांची मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठासमारे एकत्रित अंतिम सुनावणी झाली. सदर सुनावणी अंती पेन्शनबाबत केलेली मागणी मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १९.०३.२०१४ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आली. तसेच या आदेशाचा पुर्नविचार होण्यासाठी न्यायालयात दाखल केलेल्या पुर्नविचार याचिकांची एकत्रित सुनावणी होऊन सदर पुर्नविचार याचिका देखील न्यायालयाने दिनांक १९.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वये फेटाळलेल्या आहेत.

---

**देवगड सागरी तालुका असल्याने विद्युत पुरवठ्याच्या तारा व गंजलेले पोल, वीजेची अवास्तव देयकाबाबत**

**(९) ११४१९ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड सागरी तालुका असल्याने विद्युत पुरवठ्याच्या तारा व गंजलेले पोल, वीजेची अवास्तव देयक वारंवार होणारा खंडीत वीजपुरवठा यामुळे जिवीत व वित्त हानी होणे, सहाय्यक अभियंता याची रिक्त पदे त्यामुळे ग्राहकाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष होणे, याबाबच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१५ मध्ये कणकवली विभागीय कार्यालयाकडे करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या तक्रारीनुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेय,

(३) असल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. अवास्तव वीज देयकांबद्दल तसेच उपकार्यकारी अभियंता यांचे रिक्त पदाबाबत दुरध्वनीवरुन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) गंजलेल्या विद्युत तारा व पोल बदलण्याचे काम मे.बी.व्ही.जी. इंडिया, पुणे या ठेकेदारामार्फत इन्फ्रा-१, बॅलन्स वर्क, योजनेतंर्गत करण्यात येत आहे, देवगड उपविभागांतर्गत लघुदाब ७५३ पोल, उच्चदाब ५९ पोल व ५५.७ किमी कंडक्टर बदलण्याचे काम प्रस्तावित आहे. सदर कामे अंशत: पुर्ण झालेली असून उर्वरित कामे कंत्राटदाराकडून लवकर पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा चालू आहे. देवगड उपविभागात इन्फ्रा-२ अपग्रेडेशन व मॉर्डनायझेशन योजनेतंर्गत उच्चदाब वाहिनीचे ६५ पोल व लघुदाब वाहिनीचे १२८ पोल बदलण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यासंबंधीच्या निविदांची कार्यवाही चालू आहे. देवगड उपविभागामध्ये देवगड, जामसंडे गावात डिसेंबर,२०१४ या महिन्यात २०० ग्राहकांना चुकीची बिले गेली होती. सदर बिलेही ग्राहकांच्या विनंती अर्जानुसार दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहेत. देवगड उपविभागाकडे उपकार्यकारी अभियंता या पदाकरिता अतिरिक्त कार्यभार पहावयाचे आदेश सिंधुदुर्ग मंडल कार्यालयामार्फत देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर येथील सहायक कामगार आयुक्तांच्या कार्यालयात कर्मचारी वर्ग नसल्याबाबत

**(१०) ११४२७ (०६-०४-२०१५). श्री. विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील सहायक कामगार आयुक्तांच्या कार्यालयात आयुक्तांसह एकच कर्मचारी कार्यरत असून १५ जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोनच कर्मचाऱ्यांवर लातुर, उस्मानाबाद व बीड या तीन जिल्ह्यांच्या कामाची जबाबदारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकारी व कर्मचारी नसल्यामुळे बालकामगार शोध मोहिमेसह अन्य सर्व योजना बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या कार्यालयात कर्मचारी नियुक्त करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-०६-२०१५) :**(१), (२) व (३) नाही. सहायक कामगार आयुक्त, लातूर यांचे कार्यालयात एक अधिकारी व लातुर जिल्ह्यासाठी पाच व बीड व उस्मनाबाद जिल्ह्यासाठी अकरा असे एकूण सोळा कर्मचारी कार्यरत आहेत. उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत सर्व योजनांची अंमलबजावणी होत आहे.

(४) व (५) कामगार आयुक्त, यांच्या आस्थापनेवरील गट-क ची पदे भरण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. सहायक कामगार आयुक्त लातूर या कार्यायातील गट-क (राज्यस्तरीय पदे वगळून) व गट-ड ची पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही कामगार उपआयुक्त, औरंगाबाद यांचे स्तरावरुन सुरु आहे.

---

## राज्याच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेल्या निधीपैकी संपुर्ण वर्षात फक्त ३७ टक्के रक्कम खर्च झाली असल्याबाबत

**(११) ११४३१ (०७-०५-२०१५). श्री. विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेल्या निधीपैकी संपुर्ण वर्षात फक्त ३७ टक्के रक्कम खर्च झाली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत ६६ टक्के रक्कम अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,

(३)तसेच, निधीची तरतूद असतानाही विकासकामांवर खर्च न करणा-या अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे,

(४) तसेच, तरतुद करण्यात आलेल्या निधीचा वर्षभरात कालबद्ध वापर होण्यासंदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात रु. २,३०,९३२,६३ कोटी इतकी सुधारित तरतुद करण्यात आली आहे. मा.महालेखापाल, मुंबई कार्यालयाकडून फेब्रुवारी, २०१५ अखेरच्या खर्चाची माहिती प्राप्त झाली आहे. या महितीनुसार सुधारित तरतूदीच्या तुलनेत फेब्रुवारी, २०१५ अखेर रुपये १,६७,१९७.८४ कोटी इतका खर्च झाला आहे. सुधारित तरतूदीशी खर्चाचे प्रमाण सुमारे ७२.४०% इतके आहे.

---

**वाशिम जिल्हयातील काटेपुर्णा व भोगी उपखो-यातील**
**प्रस्तावित लघु पाटबंधारे योजनेबाबत**

**(१२) ११५१४ (०६-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील काटेपुर्णा व भोगी उपखो-यातील प्रस्तावित भेडशी, वादळवाडी, मारसफळ, भामटवाडी बॅरेज व खैरखेडा, दुबलवेल या ल.पा.योजनासाठी तापी खो-यातील पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींने दिनांक १७ जानेवारी, २०१३ दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना या आदिवासी परिक्षेत्रात येतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

तापी खो-यातील (पूर्णा उपखोरे) प्रस्तावित योजनांना पाणी उपलब्धततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. ३.१२.२०१२ चे पत्रान्वये मा. राज्यमंत्री जलसंपदा यांचेकडे बैठक लावण्याबाबत विनंती केली होती.

(२) अंशतः खरे आहे.

वाकलवाडी, भामटवाडी बॅरेज, खैरखेडा या तीन योजना आदीवासी परिक्षेत्रात येतात. मेडशी, मारसूळ व दुबळवेल या योजना आदिवाशी क्षेत्रात येत नाहीत.

(३) शासन पत्र क्र. जिगांव २०१२/२२७/(१०२/१२) जसंअ दि.१७/११/२०१४ नुसार पाण्याचे नियोजनास मान्यता दिली असून सर्वेक्षणाची कामे प्रमतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजनेमधील किंवा कुटुंबामधील प्रमुखाचा मृत्यू झाल्यास करण्यात**
**येणा-या अर्थसहाय्यासाठी बी.पी.एल.ची अट घालण्यात आल्याबाबत**

**(१३) ११५१८ (०९-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजनेत समावेश असलेल्या कुटुंबामधील प्रमुखाचा मृत्यू झाल्यास करण्यात येणा-या अर्थसहाय्यासाठी बि.पी.एल.ची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीपीएल च्या अटीमुळे अनेक लाभार्थी लाभापासून वंचित राहतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्थसहाय्यासाठी बि.पी.एल.ची अट रद्द करुन अल्पभुधारकाची अट घालण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :** (१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेत कुटुंब प्रमुखाचा मृत्यु झाल्यास अर्थसहाय्य देण्यात येत नसून, दारिद्ररेषेखालील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा (स्त्री अथवा पुरुष) मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास केंद्र शासनाच्या ''राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेमधून'' एकरकमी रु.२०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

(२), (३) व (४) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना केंद्र शासनाची असल्याने तिच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार राज्य शासनास नाही.

---

**राज्यातील ३४ आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व ६ विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयकांच्या पदांना माहे एप्रिल, २०१३ पासून नसल्याबाबत**

**(१४) ११५२० (०४-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व ६ विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयकांच्या पदांना एप्रिल, २०१३ पासून मान्यता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे गत ३ वर्षापासून करार तत्वावर काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अधिका-यांचे समायोजन करण्याचा शासनाचा विचार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व विभागीय आणि जिल्हास्तरावर विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ही पदे कंत्राटी पध्दतीने सन २०१० पासून कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थान कार्यक्रम आणि त्यावरील पदे यांची मुदत दि. ३१ मार्च, २०१५ रोजी संपुष्टात आली होती. राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ९ एप्रिल २०१५ रोजी झालेल्या बेठकीत या कार्यक्रमास दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१७ या दोन वर्षाच्य कालावधीसाठी मदुतवाढ देण्यात आली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयास अनुसरुन या कार्यक्रमासाठी यापूर्वी निर्माण करण्यात आलेल्या ४० आणि नवनिर्मिती पालघर जिल्हयासाठी १ अशा एकूण ४१ पदांपैकी ४० पदांना मुदतवाढ आणि १ पद नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

---

**वाशिम जिल्ह्यामध्ये पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१५) ११५२६ (०४-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये पशुसंवर्धन विभागातील सहाय्यक पशुसंवर्धन राज्यस्तर ३ पशुधन विकास अधिकारी (जि.प.स्तर) आठ पदे, पशु विकास आधिकारी राजयस्तर ३ पदे पशुधन विकास अधिकारी विस्तार ४ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तत्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधींने २३.१.२०१३ च्या दरम्यान रिक्त पदे भरण्याबाबत लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय, आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१३ मध्ये दि.२९.६.२०१३ च्या शासन निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यामध्ये एकूण ३ उमेदवारांना पशुधन विकास अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट- अ संवर्गाची रिक्त असलेली एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले होते. त्यानुसार आयोगाने दि.१२.३.२०१५ रोजी ३०० पात्र उमेदवारांची यादी जाहीर केलेली आहे. सदर उमेदवाराची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अधिका-यांना पदस्थापना देताना वाशिम जिल्ह्याती रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला चे वाशिम येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(१६) ११५२७ (०७-०४-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक जिल्हयात कृषी महाविद्यालय सुरु करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे वाशिम येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्यात यावे याबाबत माहे जुन, ऑगस्ट, २०१३ च्या दरम्यान तत्कालीन लोकप्रतिनीधीने मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम येथे कृषी महाविद्यालय सुर करण्याबाबतचा प्रस्ताव डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला मार्फत शासनाकडून आलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालया संदर्भात मुलभूत सुविधा वाशिम येथे उपलब्ध आहेत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) वाशिम येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र कार्यरत असून या संशोधन केंद्राची सुमारे १६५ एकर एवढी जमीन उपलब्ध आहे. परंतु येथे कृषि महाविद्यालयासंदर्भात इतर सोई-सुविधांची उपलब्धता नाही.
(४) व (५) राज्यात नवीन कृषी महाविद्यालय स्थापनेच्या अनुषंगाने कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे स्तरावर सुरु आहे. सदरचा आराखडा शासनास प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करता येऊ शकेल.

---

**घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात शिधापत्रिकांचे वाटप करण्याबाबत**

**(१७) ११५३७ (०७-०४-२०१५). श्री. राजेश टोपे (घनसावंगी), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात शिधापत्रिकांचा साठा असून शिधापत्रिकाचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत ७६ टक्के नागरीकांची यादी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

घनसावंगी तहसिल कार्यालयास सन २०१२ मध्ये एकूण ३२८१४ दुय्यम शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच ऑक्टोबर २०१४ मध्ये एकूण ९०९८ दुय्यम शिधापत्रिका व ५००० शिधापत्रिका नव्याने वितरित करण्यात येत असून त्यापैकी १४२७ नवीन शिधापत्रिका तलाठी यांचेकडे वाटपासाठी देण्यात आल्या आहेत. इतर शिधापत्रिकांचे मागणीप्रमाणे वाटप सुरू आहे.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत १३ व्या वित्त आयोगाच्या**
**काम वाटपामध्ये झालेल्या अनियमीततेबाबत**

**(१८) ११५६२ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत १३ व्या वित्त आयोगाच्या निधी मधुन दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. १८ नुसार विविध कामे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, उपरोक्त मंजूर कामांना दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यापूर्वीच दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजीच काम वाटप समितीच्या सभेतेच मंजूर कामगार संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना वाटप करण्यात आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर १३ व्या वित्त आयोगाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळण्यच्या आगोदरच काम वाटप समिती ने वाटप केल्या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास,सदरचे काम वाटप करतांना झालेल्या अनियमितताबाबत संबंधीतांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.१४/८/२०१४ मधील ठराव क्र.११ अन्वये १३ व्या वित्त आयेगामधून कामांना प्रशासकीय मान्याता प्रदान करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. तसेच ठराव क्र.१८ अन्वये दिनांक १३/६/२०१४ च्या सर्वसाधारण सभेद्वारे मान्यता प्रदान केलेल्या कामांच्या यंत्रणेमध्ये बदल करणेबाबत शिफारस केली आहे.

(२) नाही, दि.१२ ऑगस्ट, २०१४ रोजी जिल्हा परिषद बांधकाम विभाग काम वाटप समिती सभेचे आयोजन करण्यात आले होते.

(३) नाही. दि.१२/८/२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्याता प्राप्त कामांचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हा परिषदेअंतर्गत सन २०१३-१४ पासून सेवानिवृत्त कर्मचा-यांना १९ पेंशन च्या लेख्याशिर्षका अंतर्गत रक्कम न मिळाल्याबाबत**

**(१९) ११५६६ (०८-०५-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषदे अंतर्गत सन २०१३-१४ पासून सेवा निवृत्ती कर्मचा-यांना १९ पेशंन या लेखाशीर्षाअंतर्गत स.नि.उपदान व अंशराशीकरण रक्कमेचे प्रदान करण्यात आले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवा निवृत्ती विषयक लाभाचे प्रदान करण्यास विलंबाची कारणे कोणती,

(३) असल्यास, सेवा निवृत्त कर्मचा-यांना लाभाचे प्रदान करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सेवानिवृत्त कर्मचा-यांना दरमहा नियमितपणे सेवानिवृत्ती वेतन वाटप करण्यात येते. सन २०१३-१४ मध्ये रु.३३०९.३१ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली. त्यामधून रु.१८८.३२ लक्ष इतकी तरतूद ज्येष्ठता क्रमानुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांना उपदान व अंशराशीकरणाचे प्रदानेकरीता वाटप करण्यात आली.

सन १४-१५ मध्ये रु.३९१५.४५ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली. त्यामधून रु. १३९.७५ लक्ष इतकी तरतूद ज्येष्ठता क्रमानुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांना उपदान व अंशराशीकरणाचे प्रदानेकरीता वाटप करण्यात आली.

जिल्हा परिषद बुलढाणा यांना निधीच्या उपलब्धतेनुसार उपदान व अंशराशीकरणाच्या प्रदानासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**बुलढाणा जिल्हा परिषदे अंतर्गत घेण्यात आलेल्या आरोग्य सेवक (पुरुष) पदाच्या लेखी परीक्षेचा पेपर फुटल्याबाबत**

**(२०) ११५६७ (०८-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत नुकत्याच घेण्यात आलेल्या आरोग्य सेवक (पुरुष) पदाच्या लेखी परीक्षे दरम्यान पेपर फुटीचा प्रकार निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात दोषीवर काय कार्यवाही शासनाकडून करण्यात आली होती,

(३) असल्यास, पोलीस तपासात सदर प्रकरणात जिल्हा परीषदेच्या काही अधिकारी, कर्मचारी दोषी असल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५)** :(१), (२) व (३) आरोग्य सेवक (पुरुष) पदाच्या लेखी परिक्षा दिनांक ३०/११/२०१४ रोजी घेण्यात आली परिक्षेदरम्यान काही उमेदवार मोबाईलवरुन कॉपी करताना पकडण्यात आले त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलीस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**१३ व्या वित्त आयोगाचा निधी लोकसंख्येच्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करणेबाबत**

**(२१) ११५७५ (०८-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १३ व्या वित्त आयोगाचा निधी लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचयातींना ७० टक्के निधीचे वितरण करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपचंयाततींना उपलब्ध करून द्यावयाचा ७० टक्के निधीपैकी ५० टक्के निधी राज्यस्तरावरून राखून ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे काही ग्रामपंचयतींना दरवर्षी अवघे १० ते २० हजार रूपयांपर्यंतचाच निधी या माध्यमातून उपलब्ध होत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, यामधून ग्रामविकासाचे कोणते उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) केंद्रीय १३ व्या वित्त आयोगाचा निधी हा अबांधिल स्वरुपाचा असून, प्राप्त झालेला निधी राज्यातील सर्व पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी वितरीत करण्यात येतो. वितरीत केलेल्या निधीतून पंचायत राज संस्थांनी कोणकोणती कामे हाती घ्यावीत, यासंदर्भात दिनांक ३०/८/२०१० च्या शासन निर्णयामध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून, त्यानुसार पंचायत राज संस्थांकडून कामे केली जातात.

---

**उर्दु निवासी अरीबी मदरस्यांना कमी दरात धान्य पुरवठा होत नसल्याबाबत**

**(२२) ११५७७ (०८-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उर्दु निवासी अरीबी मदरस्यांना शासनामार्फत कमी दरात धान्य पुरवठा करणेबाबत शासन निर्णय झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत बुलडाणा जिल्ह्यातील सरसकट सर्व उर्दु निवासी अरीबी मदरस्यांना शासनामार्फत कमी दरात धान्य पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर बाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यातील उर्दु निवासी अरीबी मदरस्यांना कमी दरात धान्य पुरवठा देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२०-०५-२०१५) :** (१) होय, दि.२६.४.२००२ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार राज्यातील कल्याणकारी संस्था अल्प संख्यांकाच्या स्वयंसेवी शिक्षण संस्था (अनाथालाय/यतीम खाना) इत्यादींना बीपीएल दराने धान्य पुरवठा करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदींनुसार धान्य पुरवठा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व प्रकारच्या सांख्यिकीय माहितीसाठी UDISE या संगणक प्रणालीचा वापर करण्याबाबत**

**(२३) ११५७८ (०९-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व प्रकारच्या सांख्यिकीय माहिती साठी UDISE या संगणक प्रणालीचा वापर करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संगणकीय प्रणालीच्या संचलन व व्यवस्थापनासाठी तांत्रिकदृष्ट्या शिक्षित कर्मचारी वर्गाची नियमित नेमणूक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) UDISE फॉर्म प्रत्येक शाळेने भरणे अपेक्षित असून तालुका/जिल्हा स्तरावर सदर प्रणालीच्या संचलन व व्यवस्थापनाकरीता कंत्राटी तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देऊळघाट (ता.जि.बुलढाणा) व रोहिनखेड (ता.मोताळा,जि.बुलढाणा) येथील पुरातन काळातील परकोट, कमानी, मस्जीद जतन करणेबाबत**

**(२४) ११५८८ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मौजे देऊळघाट (ता.बुलढाणा) येथे पुरातन काळापासून परकोट व

कमानी तसेच मौजे रोहीनखेड (ता.मोताळा) येथे पुरातन काळातील मस्जीद बांधलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरातत्व विभागाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे उपरोक्त दोन्ही गावातील ऐतिहासिक वास्तु नष्ट होण्याच्या स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही गावातील पुरातन काळातील वास्तुंचे जतन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर वास्तु या राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या भारतीय पुरावत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय नागपूर यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविभाग, नागपूर यांनी कळिवल्यानुसार सदर वस्तु चांगल्या स्थितीत आहेत. सदर स्मारकांच्या जतन व दरुस्तीकरीता मागील वर्षात एकूण रु.२९,८९३/- इतका खर्च केला असून चालू आर्थिक वर्षात देखील कामे प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात खुल्या बाजारात सुरु असलेल्या किरकोळ व घाऊक हॉटेलवर खुल्या खाद्यपदार्थांची होणारी विक्री बंद करणेबाबत**

**(२५) ११५९० (०६-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खुल्या बाजारात सुरु असलेल्या किरकोळ व घाऊक हॉटेलवर खुल्या स्वरुपात खाद्यपदार्थ विकल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किरकोळ व घाऊक हॉटेल्स धारक खुल्या स्वरुपात करीत असलेल्या खाद्य पदार्थ विक्रीस अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत परवानगी दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधीत विभागामार्फत नागरिकांच्या आरोग्याला घातक असणाऱ्या खाद्यपदार्थांची विक्री करणा-या परवानाधारक हॉटेलची नियमित तपासणी करण्यात येते काय,
(४) असल्यास, किरकोळ व घाऊक हॉटेल्सवर खुल्या स्वरुपात करीत असलेल्या खाद्य पदार्थ विकण्यास बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानदे कायदा व त्या अंतर्गत नियमानुसार अन्न व्यावसायिकांना परवाने देण्याचे काम केले जाते.
(३) होय.

(४) किरकोळ व घाऊक हॉटेलवर अन्न पदार्थ विक्री करताना अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थांसाठी परवाने व नोंदणी) नियमन २०११ मधील परिशिष्ट ४ चा भाग V मधील तरतुदीचे पालन करणे अनिवार्य आहे. सदर भाग V मध्ये खाद्य पेय प्रबंधक (catering)/अन्न सेवा आस्थापना यांचे आरोग्य व स्वच्छता विषयक आचरण याबाबत तरतूदी देण्यात आल्या आहेत.

अन्न सुरक्षा व मानके कायदा लागू झाल्यापासून राज्यातील एकूण ५०७१ तपासण्या करण्यात आलेल्या असून त्यापैकी १९४८ पेढयांना सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या असून,५४७ हॉटेल्सचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच हॉटेल्समधून घेतलेल्या ११५४ नमून्यापैकी १००६ नमुने प्रमाणित तर १०२ नमुने कमी दर्जाचे व ४४ नमुने असुरक्षित घोषित झाले आहेत. कमी दर्जा प्रकरणी न्यायनिर्णय व तडजोड आणि असुरक्षित प्रकरणी न्यायालयात खटले दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच तपासण्या व तडजोड प्रकरणी एकूण रु. ४५,०८,३५०/- दंड वसूल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील ४५० सहकारी संस्था अवसायानात निघाल्याबाबत**

**(२६) ११६०० (०९-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील ४५० सहकारी संस्था अवसायनात निघाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतची सर्वसाधारण कारणे कोणती,

(३) अवसायानात निघालेल्या संस्था पुनर्जीवित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच बुलढाणा जिल्हयातील २४१२ सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी झाली असल्यास त्यापैकी किती सहकारी संस्थांची ऑनलाईन करण्यात आली नाही व ती न करणा-या संबंधित सहकारी संस्थांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०५-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे. बुलढाणा जिल्हयात मार्च, २०१४ अखेर एकूण ५९४ संस्था अवसायनात घेण्यात आलेल्या आहेत.

(२) सदर संस्था अवसायनात घेण्यासाठी संस्थेने ऑनलाईन नोंदणी न करणे, कायद्यातील तरतुदीनुसार संस्थेची आर्थिक पत्रके विहीत वेळेत निबंधकाकडे वेळीच दाखल न करणे, कलम ८१(१) नुसार सहकार आयुक्त यांचे नामतालिकेवरील लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण करुन न घेणे, विहीत मुदतीत आमसभा न घेणे, कलम ७९ अन्वये अनिवार्य रिटन्स ऑनलाईन अपलोड न करणे आणि संस्थेच्या मुळ उद्देशानुसार कामकाज न करणे अशी कारणे आहेत.

(३) यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १९ मध्ये संस्थेच्या पुर्नरचनेबाबत स्पष्ट तरतुदी नमूद आहेत, यासाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याची आवश्यकता नाही.

(४) बुलढाणा जिल्ह्यातील दि. ३१.३.२०१४ अखेर बुलढाणा जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे अधिपत्याखालील एकूण १९३२ सहकारी संसथा आहेत व दुग्ध व इतर संस्था मिळून एकूण २४७४ नोंदणीकृत सहकारी संस्था आहेत. त्यापैकी १९४३ संस्थांचे Vadidation करण्यात आलेले आहे. ज्या संस्थांनी Online Registration बाबत कार्यवाही केलेली नाही. तया संस्था तपासणीअंती अवसायनात घेवून नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायतींना नगर पंचायतीचा दर्जा देण्याच्या पुर्वी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा व संग्रामपूर येथील नगर पंचायत करण्याबाबत**

**(२७) ११६१८ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुकास्तरावरील ग्रामपंचायतींना नगर पंचायतीचा दर्जा देण्याच्या पुर्वी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा व संग्रामपूर येथील नगर पंचायत विकास प्रक्रिया कोणत्या स्तरापर्यंत झाली आहे,
(२) नगर पंचायत निर्मिती संदर्भात यापूर्वी अधिसुचना काढण्यात आली होती व हरकतींचा मुद्दा निकाली निघाला असुन अंतीम अधिसुचना काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) राज्यातील अशा किती ग्रामपंचायतींना नगरपंचायतींचा दर्जा मिळणार आहे,
याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील तालुका मुख्यालय ठिकाणी असलेल्या सर्व ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर करण्याबाबत शासनाचा हेतू असल्याबाबतची उद्घोषणा दिनांक ०१.०३.२०१४ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर उद्दघोषणेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सुचना यांचा विचार करुन ग्रामविकास विभागाच्या सहमतीने बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपुर व मोताळा येथे नगरपरिषद स्थापनेबाबतची अंतिम अधिसुचना दिनांक ०४.०३.२०१५ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक ०१.०३.२०१४ रोजीच्या उद्घोषणेच्या अनुषंगाने राज्यातील तालुका मुख्यालय असलेल्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर करण्याबाबत ग्रामविकास विभागाची सहमती प्राप्त झाल्यानंतर उर्वरित सर्व ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र राज्यात अपंग प्रोत्साहन विवाह योजना अंतर्गत**
**(५०.००० रु.) बक्षीस देण्यात येत असल्याबाबत**

**(२८) ११६२७ (१०-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात अपंग प्रोत्साहन विवाह योजना अंतर्गत ५०.००० रु. बक्षीस (रोख २५.०००/- व वस्तु स्वरुपात २५.०००/-) देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेस लेखा शिर्ष तथा कोणत्याही प्रकारची तरतुद आज पर्यंत शासनाने केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेबांत लेखा शिर्ष व तरतुद उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर योजनेकरीता नवीन लेखाशिर्षबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सहायक अभियंता पदाच्या उमेदवाराची**
**निवड होऊन सुध्दा उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली नसल्याबाबत**

**(२९) ११६२८ (०६-०४-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री. रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील विविध खात्यातील अभियांत्रिकी पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परिक्षा घेऊन निवड केलेल्या उमेदवारांची यादी माहे मार्च २०१४ मध्ये वा त्यासुमारास संबंधीत विभागांना पाठविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात सहायक अभियंता (स्थापत्य) ग्रेड -II पदाच्या १५५ उमेदवाराची निवड होऊन, १ वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटुन सुध्दा उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमेदवारांना नियुक्ती देण्यास विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०५-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक परिस्थितीमुळे शिफारासप्राप्त सर्व उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नियुक्ती देणे शक्य नसल्याने त्यापैकी काही उमेदवारांना इतर विभागांत सामावून घेण्याबाबत तपासणी करण्यात आल्याने प्रकरणी विलंब झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शिफारसप्राप्त उमदेवारांची वैद्यकीय तपासणी व चारित्र्य

पडताळणी करण्याबाबत दि.३१.३.२०१५ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक व पोलीस आयुक्त यांना कळविण्यात आले असून याबाबतचा अहवाल संबंधितांकडून प्राप्त होताच कागदपत्रांची पडताळणी करुन संबंधित उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नवी मुंबई खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथे बारावीच्या परिक्षेसाठी परिक्षा केंद्र नसल्याबाबत**

**(३०) ११६४० (०९-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथे बारावीच्या परिक्षेसाठी परिक्षा केंद्र नसल्याने विद्यार्थ्यांना कळंबोली, पनवेल शहरामध्ये जावे लागत असल्याने खारघर टोलनाक्यामुळे आर्थिक भुर्दंड पडत असून वेळही वाया जात असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारघर परिसरात स्वतंत्र परिक्षा केंद्र उपलब्ध करून देण्याची मागणी या विभागातील महाविद्यालयांनी परिक्षामंडळाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार चौकशी करून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) पुढील फेब्रु./ मार्च २०१६ च्या परीक्षेपासून परीक्षा केंद्र निर्माण करण्याचा प्रस्ताव राज्यमंडळाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कसोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे वसंत सहकारी साखर कारखान्यांवर जिल्हाधिकारी जळगांव यांची अवसायक म्हणून नेमणूक करण्यात आल्याबाबत**

**(३१) ११६६३ (०९-०४-२०१५). डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे वसंत सहकारी साखर कारखान्यांवर जिल्हाधिकारी जळगांव यांची अवसायक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवसायक म्हणून त्यांची नियुक्ती केव्हा करण्यात आली व त्यांनी कार्यभार केव्हा स्वीकारला,

(३) अद्याप कार्यभार स्वीकारला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) साखर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र.आसा/प्रशा-३/वसंतससाका/अंतिमअवसायन/२४२/६०३६/१४ दि.२९ मार्च, २०१४ अन्वये अवसायक म्हणून मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांनी अद्याप पदभार स्विकारलेला नाही.

(३) विशेष लेखापरिक्षकांकडून कारखान्याची आर्थिक पत्रके तयार करुन घेऊन कार्यभार स्विकारण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सावकरनगर, औधव नगर, शंतीवन, श्रीकृष्णनगर (बोरिवली, मुंबई) येथील रस्त्यावर होणाऱ्या बेकायदेशीर अनधिकृत पार्किंग थांबविण्याकरिता सदर विभाग नोपार्किंग झोन म्हणून जाहिर करणेबाबत**

**(३२) ११६७६ (०४-०४-२०१५). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावकरनगर, औधव नगर, शंतीवन, श्रीकृष्णनगर (बोरिवली, मुंबई) येथील रस्त्यावर होणाऱ्या बेकायदेशीर अनधिकृत पार्किंग थांबविण्याकरिता सदर विभाग नो पार्किंग झोन म्हणून जाहिर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, परिवहन, संजय गांधी राष्टीय उदयान समोर, बोरिवली यांच्याकडे दिनांक १० डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) वाहतूक पोलीस मुख्यालयाच्या दि.९.४.२०१५ च्या आदेशान्वये संत ज्ञानेश्वर मार्गावर सर्व प्रकारच्या प्रवासी वाहतूक करणा-या बसेस व जड-अवजड वाहनांना पार्किंगकरीता बंदी घालण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपरगरातील मागाठाणे येथील अंगणवाडी व बालवाडींची अत्यंत दुरवस्था**

**(३३) ११६८६ (०६-०४-२०१५). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपरगरातील मागाठाणे येथील अंगणवाडी व बालवाडींची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंगणवाडी व बालवाडीच्या दुरुस्तीकरिता तसेच आधुनिक व कल्पक शैक्षणीक साहित्य उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला अहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) अंगणवाडी केंद्राकरीता आधुनिक व कल्पक शैक्षणिक साहित्य खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(अ) तोंड ओळख अंग्रजी भाषेची - दि.२.०४.२०१४ रोजी पुरवठा करण्यात आले आहे.
(ब) प्रबोधनपर माहिती पुस्तिका - दि. २८.१०.२०१४ रोजी पुरवठ करण्यात आले आहे.
(क) प्रबोधन संदेश चार्ट - दि.२८.१०.२०१४ रोजी पुरवठ करण्यात आले आहे.
(ड) प्रबोधनपर फ्लॅश कार्ड - दि.२८.१०.२०१४ रोजी पुरवठ करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दहिसर नदीवर श्रीकृष्णनगर येथे कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबत**

**(३४) ११६८९ (०६-०४-२०१५). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दहिसर नदीवर श्रीकृष्णनगर येथे कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधून पाणी अडवून सार्वजनिक गणेश विसर्जनासाठी गणेश घाट, जलक्रिडा, पर्यटनासाठी वापर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय पुढे चालू राहण्याच्या दृष्टीने अतिरिक्त निधी मिळण्याबाबत**

**(३५) ११७१५ (०४-०४-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथे दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सन २००८-२००९ या वर्षापासून

शासनाने सुरु केले तथापि, अपुऱ्या निधी अभावी सदरहू महाविद्यालय पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुरे साधन सामुग्री, अपुरी जागा व अल्प शिक्षकांवर अनेक विद्यार्थ्यांचा भार यामुळे या विद्यालयाच्या शैषणिक प्रगतीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महाविद्यालय पुढे चालू राहण्याच्या दृष्टीने सन २०१३-१४ या वर्षाकरीता रूपये १४१६.६२ एवढा अतिरिक्त निधी आवश्यक असल्याचे शासनाने त्यादृष्टीने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही कारण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५)** :(१) हे खरे नाही.

उदगीर, जि.लातूर येथे दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सन २००८-२००९ या वर्षापासून शासनाने सुरु केले आहे. सदर महाविद्यालय पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने सन २००८-०९ ते २०१४-१५ या कालावधी मध्ये विद्यापीठाच्या मागणी प्रमाणे रु.३२४.६४ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सद्यस्थितीत सदर महाविद्यालय पुढे चालू ठेवण्यासाठी शा.नि. दि.३ मार्च, २०१४ अन्वये ३७ शिक्षक व शिक्षकेत्तर नवीन पदे निर्मितीसह १८ पदांचे काम बाह्यस्त्रोस्ताद्वारे करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच महाविद्यालयाची स्वतःची स्वतंत्र इमारत, प्रयोगशाळा मुलांसाठी वसतिगृह, यंत्रसामुग्री, इ. सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी रु.५७५८.०७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून ५ वर्षे टप्याटप्याने विद्यापीठाच्या मागणी नुसार उपलब्ध करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातपूर (जि.नाशिक) येथील उद्योगभवनाच्या आवारातील कचरा कुंडीत अन्न व औषध प्रशासनानं जप्त केलेले खादय पदार्थांचे नमूने टाकून देण्यात आल्याबाबत**

**(३६) ११७४० (०६-०४-२०१५). श्री. योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री. सुभाष साबने (देगलूर), श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (जि.नाशिक) येथील उद्योगभवनाच्या आवारातील कचरा कुंडीत अन्न व औषध प्रशासनाने जप्त केलेल्या खादय पदार्थांचे नमूने टाकून देण्यात आल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास काही जागृत नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली येथील सहायक कामागार आयुक्त कार्यालयामार्फत**
**अधिकृत सुरक्षा योजनेनुसार अर्ज मागविण्याबाबत**

**(३७) ११७५२ (०६-०४-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील सहायक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत अधिकृत सुरक्षा योजनेनुसार अर्ज मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची छाननी करुन व संबंधिताची चाचणी घेऊन प्रतिक्षा यादी तयार करुन व त्याला शासनाकडून मंजूरी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंतिम यादी तयार करण्याची अंतिम मुदत दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ पर्यंतची आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत सदर यादी तयार करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही, कारण सहायक कामगार आयुक्त, सांगली यांनी शारिरिक चाचणी व मैदानी चाचणीत पात्र झालेल्या उमेदवारांच्या नोंदणीस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २६/८/२०१४ रोजी शासनास सादर केला होता. तथापी भरती प्रक्रियेनंतर अंतिम निवड झालेल्या सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने दिनांक ९/१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विहित केलेल्या विवरणात प्रमाणपत्रासह सादर करण्याविषयी मंडळास कळविले असून त्यानुसार मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील निम्न तापी प्रकल्प पाडळसरे या प्रकल्पातील**
**धुपे खु हे १०० टक्के बुडीत असल्याबाबत**

**(३८) ११७६२ (०७-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील निम्न तापी प्रकल्प पाडळसरे या प्रकल्पातील धुपे खु हे १०० टक्के बुडीत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पुनर्वसनाची कामे निकृष्ट होत असल्याबाबत स्थानिक रहिवाशांनी मा. मुख्यमंत्री, मा. जिल्हाधिकारी व अधिक्षक अभियंता यांचकडे तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबधितावर काय कारवाई केली आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.

(२) अशंतः खरे आहे.

धुपे ग्रामस्थांनी सदरची तक्रार विभागीय आयुक्त, नाशिक यांचेमार्फत अधीक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव यांच्याकडे प्राप्त झाली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुनर्वसन कायद्यांतर्गत देय नागरी सुविधांच्या झालेल्या कामांच्या गुणनियंत्रण विभाग, धुळे यांचे मार्फत घेतलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष पडताळण्यात आले असून सदर निष्कर्ष विनिर्देशासनुसारच्या मापदंडात आहेत. तथापि, सदर कामांची चौकशी त्रयश्य कार्यकारी अभियंता मार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले असून चौकशी अहवाह अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

**जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील गूळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे कामाबाबत**

**(३९) ११७६३ (०८-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील गूळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे काम पूर्ण झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या पाटचा-यांचे प्रकल्पाकडून रावेर सिंचन उपविभागाकडे हस्तांतर करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रावेर सिंचन उपविभागाऐवजी चोपडा तालुक्यातील हतनूर पाटबंधारे अंतर्गत सिंचन उपविभागाडे गूळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाटचा-यांचे हस्तांतरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.

(२) दिनांक २७/०८/२०१४ रोजीच्या व्यवस्थापनाचे कामाकरीता रावेर उपविभागांतर्गत विरवाडे ता. चौपडा येथे नविन शाखा कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथे व्हॉटसअॅपवर वादग्रस्त व्यंगचित्र टाकल्याबाबत**

**(४०) ११७७६ (०६-०४-२०१५). श्री. विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथे व्हॉटसअॅपवर वादग्रस्त व्यंगचित्र टाकण्याची दि. १४ जानेवारी, २०१५ रोजी अफवा पसरून एका समाजाच्या जमावाने दुकानांवर व वाहनांवर दगडफेक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यात याप्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी शासन कोणती उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) दि.१२.१.२०१५ रोजी वॉट्सअपवर प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे व्यंगचित्र टाकून धार्मीक भावना दुखाविल्यावरुन दि.१३.१.२०१५ रोजी काही समाजकंटंकाकडून अनेक व्यापारांच्या दुकानांची तोडफोड केल्याप्रकरणी घडलेल्या घटनेसंबंधी फिर्यादीच्या फिर्यादी वरुन पोस्टे, हिंगोली शहर गुरनं. ११/१५ कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३३६, ४२७ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याखाली सद्यस्थितीत २५ आरोपीतांना अटक केली असून त्यांचेवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून गुन्हा पोलीस तपासावर आहे.

राज्यातील सर्व घटकांमध्ये गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सर्वत्र सायबर क्राईम सेल तयार करण्यात आले असून त्यातील ब-याच घटकामध्ये इंटरनेट मॉनेटरिंग सेल कार्यरत असून दिवा २ व रात्री २ कर्मचारी (नेट वॉचर्स) काम करीत असतात व सदर ठिकाणी आक्षेपार्ह मजकूर आढळयास ताबडतोब कारवाई केली जाते, काही घटकामार्फत वस्तुस्थिती दर्शक, शांततेचे आवाहन करणारे पोस्टर तयार करुन ते फलेक्स, बॅनर पॅम्पलेट द्वारे प्रसिध्दी करण्यात आले तसच व्हॉट्सअप, फेसबुक, वेबसाईट, ब्लॉग व एसएमएस याद्वारे सुध्दा लोकांपर्यंत पोहचविले.

राज्यातील विविध घटकांमध्ये वेळोवेळी शांताता व मोहल्ला कमिटी समाजसेवक, राजकीय नेते तसेच प्रतिष्टीत व्यक्ती यांच्या मिटींग आयोजि करुन सदर मिटींगमध्ये तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये संबंधीत गुन्ह्याची माहिती त्वरीत कळविणेबाबत तसेच जातीय सलोखा राखणेबाबत आवाहन करण्यात येते. वृत्तपत्र, शाळा कॉलेजमध्ये तसेच हौसिंग सोसायट्यामध्ये सेमिनार आयोजित करुन लोकांमध्ये यासबंधी अवेरनेस निर्माण करुन त्यांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सथानिक केबल वाहिनी व चित्रपटगृहे येथे सायबरजनजागृती जाहीराती प्रसिध्द करुन शंतता राखण्याचे अवाहन करण्यात येत आहे, काही घटकांमार्फत त्याचे कार्यक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल वरुन तसेच व्हॉट्स ॲप वरुन विविध स्तरातील विविध लोकांना संदेश पाठवून शंततेचे आवाहन करण्यात येत आह, प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया माध्यमातून जनतेला शांततेचे आवाहन करण्यात आले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सुशिक्षित बेरोजगार सोसायटयांना कामात १६.५% कोटा देण्याबाबत**

**(४१) ११८०१ (१०-०४-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगार सोसायटयांना कामात १६.५% कोटा देण्याबाबतचा शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव सहकार विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे, व ते लवकरात लवकर लागू होणेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्‌याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५)** :(१) व (२) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून शासनाच्या कौशल्य विकास व उद्‌योजकता विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्‌योग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर पंचायत समितीत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कृषी औजारांच्या शेतकरी सहभागाच्या रकमेवर त्यासंबंधीत अधिकाऱ्यांनीच अपहार केल्याबाबत**

**(४२) ११८०७ (०७-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर पंचायत समितीत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कृषी औजारांच्या शेतकरी सहभागाच्या रकमेवर त्यासंबंधीत अधिकाऱ्यांनीच अपहार केल्याचे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आ हे काय ?

(२) असल्यास, त्यासंबंधी योग्य चौकशी करकण्यातय आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधीत भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे काय ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) संबंधीत कृषी अधिकारी श्री.आर.व्ही. कणसे यांची खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून त्यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले होते. तथापि, विभागीय चौकशी प्रकरणातील निर्णयाच्या अधिनतेने त्यांना अकार्यकारी पदावर पुर्नःस्थापित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक, सोलापूर आणि सांगली व इतर काही जिल्हयांत मोठया प्रमाणात शेळया व मेंढया मृत झाल्याबाबत**

**(४३) ११८१३ (३०-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री. अर्जुन खोतकर (जालना), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून शेतक-यांना शेतीसोबत जोडधंदा म्हणून शासनाने गेल्या काही वर्षापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे अनेक शेतक-यांना शेळयांचे वाटप केले होते, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, काही जिल्ह्यांत उदा.नाशिक, सोलापूर आणि सांगली व इतर काही जिल्ह्यांत मोठया प्रमाणात जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात शेळया व मेंढया मृत झालेल्या आहेत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ?
(३) असल्यास, महामंडळाने राज्य शासनास तब्बल ६६० शेतक-यांना शेळ्यांचे वाटप केले आहे, हे खरे आहे काय ?
(४) तसेच पशु वैद्यकीय अधिका-याकडून रोग अन्वेषन विभागाच्या प्रयोग शाळेत तपासणी केली असता पीपीआर या रोगाची लागण झाल्यामुळे शेळ्या-मेंढयांचा मृत्यु झाल्याचे उघडकिस आले आहे, हे ही खरे आहे काय ?
(५)असल्यास याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यात माहे जुलै ते डिसेंबर,२०१४ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे एकूण ३९,१८६ शेळ्या वाटप करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ६१२ शेळ्या मरतुक झाल्याबाबत माहिती प्राप्त झाली आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यास्तव खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१. गट वाटपाच्या वेळी प्रक्षेत्रावर १० दिवस शेळ्या ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. वाटपापूर्वी पीपीआर रोगाचे लसीकरण करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

३. वाटपापूर्वी जंत निर्मूलन करणे बंधनकारक आहे.

४. लाभार्थ्यास महामंडळाकडून खरेदी करण्याची अट शिथिल करुन स्थानिक बाजारातून खरेदी करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

---

### सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(४४) ११८३२ (०७-०४-२०१५). श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) युती शासनाने १९९५ साली "टँकरमुक्त महाराष्ट्र" योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबविल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सद्य परिस्थिती काय व बंद असलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी तसेच देखभाल, व्यवस्थापन सुरळीत होणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सिन्नर तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण आठ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

**(अ) समितीमार्फत/ग्रामपंचायत/मजीप्रा जलव्यवस्थापनमार्फत सुरु असलेल्या योजना**

(१) मनेगाव प्रादे.पा.पु.योजना-संकल्पित कालावधी पूर्ण झाल्याने योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नविन योजना प्रस्तावित

(२) कणकारी प्रादे.पा.पु.योजना-समिती मार्फत योजना सुरु

(३) ठाणगांव प्रादे.पा.पु.योजना-समिती मार्फत योजना सुरु

(४) भाटवाडी प्रादे.पा.पु.योजना-समिती मार्फत योजना सुरु

(५) घोरवड प्रादे.पा.पु.योजना-ग्रामपंचायतीमार्फत आवश्यकतेनुसार योजना चालविण्यात येते.

(६) नायगांव प्रादे.पा.पु.योजना-मजीप्रा मार्फत योजना सुरु .

**(ब) उदभव कोरडा झाल्याने पुनरुज्जीवित करण्यात आलेली योजना**

(७) बारागांव प्रादे. पा.पु. योजना -योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

**(क) प्रगतीपथावरील योजना**

(८) मिठसागरे पांचाळे प्रादे.पा.पु.योजना -भाग १ पाणीपुरवठा सुरु, भाग २ ची ९०% कामे पूर्ण, योजनेद्वारे मे, २०१५ अखेर पाणी पुरवठा सुरु करणे प्रस्तावित

---

**राज्यामध्ये छुपी वीज दरवाढ केल्याबाबत**

**(४५) ११८४१ (०४-०४-२०१५). श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात वीज ग्राहक संघटनेने दि.३ फेब्रुवारी २०१५ रोजी मुंबईत परिषद आयोजित करुन वीज दरवाढीस तीव्र विरोध केला आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, राज्यामध्ये वीज दरवाढ केल्यामुळे अनेक ग्राहकांना वाढीव वीज बिलांना सामोरे जावे लागत असल्यामुळे वीज ग्राहक संघटना, उद्योग संघटना व यंत्रमागधारकांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) महावितरणने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ करीता सरासरी ८% वीज दर वाढीचा प्रस्ताव आयोगाकडे सादर केला आहे. कृषि ग्राहकांना कोणतीही वीज दर वाढ प्रस्तावित नाही.

उच्चदाब औद्योगिक (एक्सप्रेस फिडर्स) वर्गवारीतील ग्राहकांच्या वीजदरात ५% घट तर लघुदाब औद्योगिक ०-२० कि.वॅ. उपवर्गवारीतील ग्राहकांच्या दरात १% घट तसेच २० कि.वॅ. पेक्षा अधिक उपवर्गवारीतील ग्राहकांच्या ७% घट प्रस्तावित केलेली आहे. घरगुती ग्राहकांसाठी पुर्वीच्या तुलनेत वीज वापरावयाच्या टप्प्यानुसार स्वतंत्र वीज दर प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंचन प्रकल्पाच्या बांधकामात चुकीच्या नियोजनामुळे मागील आर्थिक वर्षात जलसंपदा विभागाला सुमारे १२ कोटी रुपयांचा तोटा झाल्याबाबत**

**(४६) ११८५२ (०६-०४-२०१५). श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंचन प्रकल्पाच्या बांधकामात चुकीच्या नियोजनामुळे मागील आर्थिक वर्षात जलसंपदा विभागाला सुमारे १२ कोटी रुपयांचा तोटा झाल्याची बाब जानेवारी २०१५ वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, तद्‌संबंधी शासनाकडून चौकशी करण्यात येत आहे काय ?
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर काय कार्यवाही आली वा करण्यात येत आहेत ?
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५)** :(१), (२) व (३) नाही.
तथापि, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (कॅग) यांचे सन २०११-१२ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील (वर्ष २०१३ चा अहवाल क्र.४) परिच्छेद क्र. ३.३.१ मध्ये भंडारा पूरसंरक्षक भिंतीचे कामात रु. १२.८३ कोटींच टाळता येण्याजोगा खर्च झाला आहे. असे निरिक्षण नमूद करण्यात आले आहे. त्यानुषंगाने विभागाचे अभिप्राय दि. २३/०६/२०१४ च्या टिप्पणीन्वये मा.महालेखापाला यांचे कार्यालयास सादर केलेले आहेत.
(४) यासंदर्भात महालेखापाल यांचे कार्यालयाकडून अनौपचारीक संदर्भ (OUR) प्राप्त झाला असून त्यानुसार विभागाचे अभिप्राय पाठविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**मौजे ठाणगाव (ता. सिन्नर जि. नाशिक) परिसरातील वनविभागाच्या जंगलांतून मोठयाप्रमाणावर वृक्षतोड**

**(४७) ११८५५ (०६-०४-२०१५). श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ठाणगाव (ता. सिन्नर जि. नाशिक) परिसरातील वनविभागाच्या जंगलांतून मोठयाप्रमाणावर वृक्षतोड होत असल्याची बाब नोव्हेंबर २०१४ तध्ये त्या सुमारास निदर्शनास आली ही बाब खरी आहे काय ?

(२) असल्यास शासनाच्या वतीन सदर वृक्षतोड थांबविण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहेत ?

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही नसल्यास त्याच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) वनसंरक्षणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:

वन अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून जंगलात नियमित गस्त घालण्यात येते.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत स्थानिकांच्या सहकार्यातून वनसंरक्षणाची कामे करण्यात येतात.

अवैध वृक्षतोडीस आळा बसावा यासाठी ग्रामीण जनतेला गॅस कनेक्शन सारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

वनक्षेत्रामध्ये वनचौक्या उभारुन वनसंरक्षणासाठी वनकर्मचा-यांचे पथक नेमण्यात आले आहे.

---

**निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात असलेल्या कालव्यांच्या कामाच्या सद्यस्थिती बाबत**

**(४८) ११८५६ (०६-०४-२०१५). श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात असलेल्या सिन्नर तालुक्यातील सहा गावांमधील कालव्यांच्या कामाची सध्यास्थिती काय आहे ?

(२) तसेच,कामे अपूर्ण असल्यास, त्याच्या विलंबाची कारणे काय व ते केव्हापर्यंत पूर्ण होणार?

(३) तसेच, काम पूर्ण करण्याच्या हेतूने शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) सिन्नर तालुक्यातील सहा गावातील लाभक्षेत्रासाठी उर्ध्व प्रवरा डावा कालव्याच्या तळेगाव शाखेचे काम हाती घेण्यात आले आहे. सद्यःस्थितीमध्ये तळेगांव शाखा कालव्याचे किमी. १ ते ७ मधील खोदकाम पूर्ण झालेले आहे. किमी. ८ ते १५ मधील खोदकाम व कि.मी १ ते १५ मधील बांधकामे सुरु करण्यात येत आहेत. वितरण प्रणालीसाठी सर्व्हेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रके करण्यात आलेले आहेत.

(२) सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. मंजूर निविदेनुसार सदरची कामे माहे ऑगस्ट, २०१८ पर्यंत निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) उर्ध्व प्रवरा डावा कालवा अंतर्गत तळेगाव शाखा कालवा कि.मी. ८ ते १५ मधील उर्वरित खोदकाम व किमी १ ते १५ मधील संपूर्ण बांधकामांची एकत्रित निविदा मंजूर करण्यात आली असून कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

---

**शासनाने गिरणी कामगारांच्या घरांसाठी सारस्वत बँक व ॲक्सिस बँकेमार्फत माहिती संकलनाचे अर्ज भरुन घेतले यासंबंधी गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघाबाबत**

**(४९) ११८६७ (०७-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१० व २०११ मध्ये शासनाने गिरणी कामगारांच्या घरांसाठी सारस्वत बँक व ॲक्सिस बँकेमार्फत माहिती संकलनाचे अर्ज भरुन घेतले यासंबंधी गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ या सारख्या संस्थांसमवेत शासन दरबारी मंत्रालयात बैठक घेण्यात आली. त्यावेळी कामगारांच्या माहिती करिता प्रिंटमिडीया तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून तसेच गावोगावी दवंडी देऊन माहिती प्रसारित करण्यात येईल असे आश्वासन दिले गेले होते. तथापी अनेक गिरणी कामगारांनी माहिती संकलनाचे अर्ज माहिती अभावी अद्याप दिलेले नाहीत. याबाबत गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या उर्वरित गिरणी कामगारांपैकी काही नावे माहिती संकलन केलेल्या यादीत समाविष्ट करण्याबाबत विनंती अर्ज सादर केला असून त्यामध्ये ३४८ गिरणी कामगार वा त्यांचे वारस यांची नावे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या गिरणी कामगारांची /वारसांची नावे माहिती संकलन यादीत नाहीत त्यांची नावे सदर यादीत समाविष्ट करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०६-२०१५) :**(१), (२) व (३) मुंबईतील बंद/आजारी गिरणी कामगारांची सन २०१० व २०११ मधील अशी दोन वेळा माहिती संकलित करण्यात आली आहे तथापि, सदरहू मोहिमेदरम्यान प्राप्त झालेल्या काही अर्जावर अर्जदारांकडून अथवा बँकेकडून माहिती भरतांना गिरणी कामगारांचे नाव गिरणी कोड (मिल संकेतांक) क्रमांक इ. बाबत झालेल्या युका दुरुस्त करण्यास संबंधित अर्जदारांना मुभा देण्यात आलेली आहे. तसेच यापूर्वी अर्ज सादर करु न शकलेल्या गिरणी कामगारांना शेवटची संधी म्हणून सदरहू मोहिमे दरम्यान अर्ज सादर करण्यास शासनाच्या दि. ०१.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये म्हाडस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) पंचायत समितीतील पदे रिक्त असल्याबाबत**

**(५०) ११९०९ (०६-०४-२०१५). श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उत्तर पंचायत समिती सोलापूर येथे वरिष्ठ सहाय्यक कनिष्ठ प्रशासक, आरोग्य प्रवेक्षक तसेच इतर काही पदे ब-याच दिवसापासून रिक्त आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे कधीपर्यंत भरण्यत येतील,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :**(१) सोलापूर जिल्हा परिषदेकडील उत्तर पंचायत समिति अंतर्गत कर्मचा-यांच्या एकूण २३९ मंजूर पदांपैकी २३१ पदे कार्यरत असून ८ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) नियमित पदोन्नतीचे किंवा माहे मे, २०१५ मधील सर्वसाधारण बदलीच्या वेळी समुपदेशनांने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.